Please Consider the Environment Before Printing…

**Date: 07/06/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर

गोपीनाथ गणेश तळवलकर हे मुलांच्या आनंद मासिकाचे संपादक व एक ख्यातनाम बालसाहित्यिक होते. तळवलकर यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९०७ रोजी झाला. ते मराठी बालसाहित्याचे एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्व होते. कणिका, खंडकाव्य, बालकविता असे विविध काव्यप्रकार हाताळूनही त्यांचे नाव झाले नाही. आकाशमंदिर, छायाप्रकाश, नंदिता या कादंबऱ्या, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व हे रसग्रहण, तसेच त्यांनी मुलांसाठी अनेक पुस्तके लिहिली होती. त्यांचे काही लिखाण 'गोपीनाथ' या टोपणनावाने केलेले आहे.

आकाशवाणीवरील बालप्रिय बालोद्यान या कार्यक्रमातील नाना म्हणजेच गोपीनाथ तळवलकर. तळवलकर हे पुणे केंद्रावर बालविभागप्रमुख होते. बालोद्यान हा मुलांचा कार्यक्रम ते आयोजित करत. रंजन व उद्बोधन यांचा सुरेख मिलाफ आणि बालकलाकारांचा सहभाग यामुळे 'बालोद्यान' त्या काळात फार लोकप्रिय झाले होते. बालसाहित्यासह प्रौढ साक्षरांसाठीही त्यांनी लिखाण केले. तळवलकर यांच्या बालसाहित्याने बालकांच्या दृष्टिकोनातून जगाचे एक नवीन रूप उभे केले. त्यांच्या कथा आणि कवितांमध्ये बालकांना निसर्गाचा आनंद, खेळांची मजा, तसेच जीवनाचे गोडवे समजावून सांगितले जात. विशेषतः, त्यांचे लेखन मुलांच्या नैतिक शिक्षणावर भर देई, पण ते एकाच वेळी त्यांचे मनोरंजनही करतं. आनंद हे मासिक १९०६ साली वासुदेव गोविंद आपटे यांनी सुरू केले, आपट्यांनंतर गोपीनाथ तळवलकर व नंतर संपादिका श्यामला शिरोळकर यांच्या संपादकत्वाखाली या मासिकाची वाटचाल चालू राहिली. गोपीनाथ तळवलकर हे ३५ वर्षे या मासिकाचे संपादक होते. गोपीनाथ तळवलकर यांचे ७ जून २००० रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jun 07, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

| | |
|---|---|
| LIBRARIAN | PRINCIPAL |
| MR.U.D. MULANI | PROF.U.B JADHAV |
| SND POLYTECHNIC | SND POLYTECHNIC |
| YEOLA-423401 | YEOLA-423401 |